# प्रेसनोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ११.०३.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपींचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.सुनिल रामदास कळमकर, वय ५८ वर्षे, पद : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती, वर्ग – १<br>२) राजेश जनार्दन गुडधे, वय ५६ वर्षे, पद : वरिष्ठ लिपीक, कार्यालय सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती, वर्ग – ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनाक ११.०३.२०२२ चे १८.१० ते १८.३० वा. दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | आलोसे क्र.१ यांनी स्विकारलेली लाच रक्कम ५०,०००/– रुपये<br>आलोसे क्र.२ यांनी स्विकारलेली लाच रक्कम ५,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती, पोस्टल कॉलनी मागे, तपोवन गेटजवळ, अमरावती |

**थोडक्यात हकिकत :** यातील तक्रारदार यांचे मामा हे शासकिय कंत्राटदार असुन त्यांनी केलेल्या २ कामा पैकी झालेल्या एका कामाचे बिल काढून दिल्याचे मोबदल्यात श्री.कळमकर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती हे ५०,०००/– रुपये तसेच लिपीक श्री.गुडधे हे १०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक ११.०३.२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे मामा यांनी पुर्ण केलेल्या कामाचे बिल मंजुर केल्याचा मोबदला म्हणून कार्यकारी अभियंता श्री.कळमकर यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रुपये तसेच लिपीक श्री.गुडधे यांनी वरिष्ठाकडे बिल सादर केल्याचा मोबदला म्हणून ५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती येथे आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान श्री.कळमकर कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे दालनामध्ये तक्रारदार यांचे मामाकडून लाचेची रक्कम रुपये ५०,०००/– स्विकारले व लिपीक श्री.गुडधे यांनी सुध्दा तक्रारदार यांचे मामाकडून ५,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र,अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, पो.ना.सुनिल व–हाडे, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ व चालक पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,२५५३०५५
टोल फ्रि नंबर–१०६४

11/3/2022

(संजय महाजन)
पोलीस उपअधीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९४०४७०३८१९

Scanned with CamScanner